सकाळ

पुणे, सोमवार, १८ फेब्रुवारी २०१९




# सिटी इंटरनॅशनलतर्फे वानवडीत जनजागृती रॅली

**वानवडी, ता. १७ :** येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पुणे रस्ते वाहतूक विभागाच्या सहकार्याने शुक्रवारी (ता. ८ फेब्रुवारी) रस्ते सुरक्षेबाबत जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन केले. वाहतूक पोलिस विभागातील स्वयंसेवक या रॅलीमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांसह सहभागी झाले होते. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी शिवाजी जाधव यांच्या हस्ते झेंडा उंचावून रॅलीचे उद्घाटन झाले.

त्यानंतर तेही रॅलीमध्ये सहभागी झाले. 'रस्ते सुरक्षा-जीवन सुरक्षा' ही रॅलीची थीम होती. शालेय विद्यार्थ्यांनी या वेळी जनजागृती घोषणा दिल्या. रस्ते सुरक्षेसंबंधील पादचारी, वाहनचालक यांना माहिती दिली. या रॅलीला फातिमा रस्त्यापासून सुरवात झाली आणि ती पुढे केदारी पेट्रोल पंपाकडे गेली. विद्यार्थ्यांमध्ये देशाच्या विकासामध्ये सहभागी होण्याची जाणीव निर्माण व्हावी, हा या रॅलीमागचा उद्देश होता. देशाच्या विकासामध्ये रस्ते सुरक्षा या विषयाची महत्त्व मोठे आहे. त्याविषयी विद्यार्थ्यांनी विचार करावा आणि सुरक्षेविषयी त्यांनी दक्ष राहावे, हा यामागे हेतू होता. या वेळी विद्यार्थ्यांनी वाहतुकीचे नियम पाळण्याचे महत्त्व, हेल्मेटचा वापर, वेगमर्यादेचे भान याविषयी नागरिकांना माहिती दिली.